औरंगाबाद महसूल विभागातील २ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्यांच्या जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजुरी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः वाहने-२०१८/प्र.क्र.२१७/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २०१९.

संदर्भ:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.जेपीएस-२०१४/प्र. क्र.७/ई-८,दि.१२/०९/२०१६.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि.२१/०१/२०१७.
३) जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे पत्र क्र. जा.क्र.२०१८/ङिसी.-२/कावि, दिनांक २९/०६/२०१८

प्रस्तावना:-

औरंगाबाद महसूल विभागातील लेखाशिर्ष “२०५३- जिल्हा प्रशासन” या खाली वेतन आहरित करणाऱ्या १३६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शासकीय वाहनांची अनुज्ञेयता संदर्भाधीन दि.१२/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी त्यांच्या संदर्भाधिन दि.२९/०६/२०१८ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, हिंगोली तसेच अपर जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेकरिता निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदीस मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

औरंगाबाद महसूली विभागातील या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र ‘अ’ मध्ये नमूद केलेल्या जिल्हाधिकारी, हिंगोली व अपर जिल्हाधिकारी, हिंगोली या २ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्यांच्या पूर्वीच्या जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास व तदप्रित्यर्थ येणाऱ्या अनुक्रमे रु. ७.०० लक्ष व रु.६.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.१३.०० लक्ष (रुपये तेरा लक्ष फक्त) च्या खर्चास खालील अटींच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.-

१) राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मान्यता दिल्यानुसार अनुज्ञेय नवीन वाहन विहीत कार्यपद्धतीस अनुसरुन खरेदी करण्यात यावे.
२) वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक २१/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सहपत्र ‘अ’ मधील अधिका-यांसाठी जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेसाठी रु. ७.०० लक्ष व अपर जिल्हाधिकारी हिंगोली यांचेसाठी रु.६.०० लाखांच्या मर्यादेतच वाहनांची खरेदी करण्यात यावी. वाहन खरेदीसाठी मंजूर केलेल्या अनुदानामध्ये वाहनाच्या किंमतीस सर्व करांचा समावेश आहे.
३) नवीन वाहन ज्या अधिकाऱ्यास मंजूर करण्यात आले आहे, त्या अधिकाऱ्यांनी सदर वाहनाचा वापर उक्त कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठी करावा.

४) नवीन वाहन खरेदी केल्यानंतर त्यांची नोंद महावाहन प्रणालीवर घेण्यात यावी त्यासंबंधी अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

२. सदर शासन निर्णयासोबतच्या सहपत्रातील अनु.क्र. १ ते २ साठी येणारा खर्च "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००)०९३ जिल्हा आस्थापना (०१) सर्वसाधारण आस्थापना (०१)(०६) आयुक्त, औरंगाबाद (२०५३ ०१२६) १३- कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीतून भागविण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.१२/२०१९/विनियम, दि.२२/०१/२०१९, अन्वये दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०२१०४८४४९४१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2019.03.02 10:51:40 +05'30'

(अजित देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
२) जिल्हाधिकारी, हिंगोली.
३) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर .
४) जिल्हा कोषागार अधिकारी,हिंगोली
५) सह सचिव/उप सचिव, वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/विनियम), मंत्रालय, मुंबई-३२.
६) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

सहपत्र 'अ'

औरंगाबाद महसूल क्षेत्रिय स्तरावरील अधिका-यांच्या वापरातील निर्लेखित वाहनांचे विवरणपत्र

(शासन निर्णय क्रमांक - **वाहने-२०१८/प्र.क्र.२१७/ई-८** दिनांक ०२ मार्च, २०१९ सोबतचे विवरणपत्र)

अ.क्र.	विभाग/ जिल्हा	वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्यांचे पदनाम	निर्लेखित वाहनाचा क्रमांक
१	औरंगाबाद/ हिंगोली	जिल्हाधिकारी, हिंगोली	MH-३८-G-९९९९
२	औरंगाबाद/ हिंगोली	अपर जिल्हाधिकारी, हिंगोली	MH-३८-G-७७७७

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2019.03.02 10:51:57 +05'30'

(अजित देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन